# आदिम,संस्कृती,अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र

मु.फलोदे,पो.तळेघर,ता.आंबेगाव, जिल्हा-पुणे

( रजि नं- एफ 47,365 )

# वार्षिक अहवाल

## सन -२०१९-२०

# अनुक्रमणिका


- प्रास्ताविक
- 

# प्रास्ताविक

सन २०१९-२० या वर्षाचा संस्थेचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना आम्हाला नक्कीच मनस्वी आनंद होत आहे.संस्थेने या वर्षात काही महत्वपूर्ण कामे केली त्याचा आढावा या अहवालात सविस्तर घेतेलेला आहे.यावर्षीचा अहवाल हा केवळ माहिती देणारा नसून तो झालेले कार्यक्रम त्याची उपयुक्तता,त्याची चीकीस्ता व मर्यादा हि सांगणारा हा अहवाल आहे.

यावर्षी मागील वर्षात सुरु झालेला साक्षरता प्रकल्प नुकताच संपला,व या वर्षात पुन्हा ९ ठिकाणी साक्षरता वर्ग सुरु झालेले आहेत.रोटरी क्लब,पुणे च्या साक्षरता समितीने संस्थेवर जो विश्वास दाखवला त्यबद्दल त्यांचे आम्ही मनपूर्वक आभारी आहोत.याबरोबरच  सुमारे ५० मुलीना आपण सायकल देऊ शकलो त्यामुळे या मुलींचा वेल वाचून त्यांना अभ्यासाला वेळ मिळेल हि अत्यंत उपयुक्त अशी बाब ठरली.

याबरोबरच मागील वर्षी संस्थेने शहीद राजगुरू ग्रंथालय यांना रुग्णवाहिका मिळणेसाठी यथायोग्य अशी मदत केली होती.त्या रुग्णवाहिकेचा हि स्थानिक लोकांना अतिशय चांगला उपयोग होत आहे हि हि जमेची बाजू आहे.

याबरोबरच मानव्य संस्थेच्या सहकार्यातून सुमारे ४३ ठिकाणी आपण अत्यंत यशस्वीपणे एच.आय.व्ही आजारविषयक माहिती प्रदान केली.हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी पणे पार पडला .या बरोबरच मार्च २०१२० च्या दरम्यान सबंध जगभरात करोना या विषाणूने थैमान घातले.या विषयी हि दोन दिवस सलग फिरून आंबेगाव तालुक्यातील सुमारे ३८ ठिकाणी जावून २००० पेक्षा अधिक कुटुंबाना माहिती देण्यात आली होती.

# शैक्षणिक उपक्रम-

## १.फलोदे व सावरली प्राथमिक शाळेतील मुलांना चप्पल वाटप –

आदरणीय समीर पांडे सर यांच्या स्वखर्चातून फलोदे व सावरली या शाळेतील सुमारे ३३ मुले-मुली यांना चप्पल वाटप करण्यात आली.ऐन उन्हाळ्यात या मुलांच्या पायात चप्पल नसल्याने त्यांना उन्हाचे चटके सोसावे लागत होते.या पार्श्वभूमीवर या मुलांना मा.समीर पांडे सर यांनी चप्पल उपलब्ध करून दिल्या.यामुळे मुला-मुलीं-शाळेतील येण्याचे प्रमाण नक्कीच वाढले आहे.




## २.पोखरी व जांभोरी गावातील सुमारे ५० मुलीना सायकल वाटप-

पोखरी व जांभोरी ३ ते ४ किलोमीटर अंतरावरून मुले-मुली शाळेत येतात.विशेषत हि सर्व मुले-मुली इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वीच्या वर्गातील आहेत.यातील मुलींचे शाळा दूर असल्याने खूपच हाल होतात.मुलीना घरातील कामे करून शाळेला यावे लागते व पुन्हा शाळेतून घरी गेल्यावर आईला घरकामात मदत करावी लागते.यामुळे मुलीना अभ्यास करण्यासाठी कमी वेळ मिळतो.या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब निगडी यांना संस्थेने अशा मुलींकरिता सायकल उपलब्ध व्हाव्यात यासाठी विनंती केली होती.व प्रत्येक सायकल मागे १००० रुपये मुलींच्या पालकाकडून घेऊन सबंधित रोटरी क्लब यांना देण्यात आले होते.यातील ३० सायकल या पोखरी येथील शाळेतील मुलीना तर २० सायकली जांभोरी येथील मुलीना देण्यात आल्या.दि.१-५-२०१९ रोजी हा कार्यक्रम पोखरी शालेयील प्रांगणात पार पडला.यावेळी रोटरी क्लब निगडी चे पदाधिकारी व आदिम संस्थचे पदाधिकारी,पालक विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते.



# साक्षरता प्रकल्प –

## प्रास्ताविक-

औपचारिक शिक्षणाचा दर्जा उंचवायचा असेल तर अनौपचारिक शिक्षणाची व्याप्ती व गुणवत्ता वाढीस लागली पाहिजे.हि भूमिका स्पष्ट असल्याने आपण साक्षरता कार्यक्रमाची चळवळ वेगळया पद्धतीने राबवीत आहे.साक्षरता कार्यक्रमात लेखन,वाचन,गणित याबरोबरच आर्थिक,कायदा,आरोग्य साक्षरता हि या साक्षरता कार्यक्रमाच्या माध्यमातून दिली जात आहे.असे १७ साक्षरता वर्ग आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात सुरु करण्यात आले आहे.या साक्षरता वर्गात सुमारे ३००ते ३५० आदिवासी महिला-पुरुष साक्षर होत आहे.या प्रकल्पाला संपूर्ण सहकार्य रोटरी क्लब साक्षरता समिती,पुणे हि करीत आहे.यामध्ये पुणे जिल्ह्यातील निवडक रोटरी क्लब सहभागी झालेले आहेत.

## १.साक्षरता स्वयंसेवक प्रशिक्षण –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात एकूण १७ साक्षरता वर्ग सुरु आहेत.या साक्षरता वर्गात शिकण्यास येणाऱ्या महिलांना लेखन,वाचन याबरोबरच विविध प्रकारची साक्षरता प्रदान केली जात आहे.या अनुषंगाने या साक्षरता वर्गात शिकविण्याचे काम करणाऱ्या स्वयंसेवक ताई यांचे प्रशिक्षण दि.४-४-२०१९ रोजी शहिद राजगुरू,ग्रंथालय,फलोदे येथे पार पडले .या प्रशिक्षणात श्री.उज्ज्वल तावडे ,डॉ.हनुमंत भवारी,अमोल वाघमारे व श्रीमती वंदना कुलकर्णी यांनी प्रशिक्षण दिले.या प्रशिक्षणात साक्षरता वर्ग व स्वयंसेवक यांची कौशल्ये आणि साक्षरता वर्ग व सामाजिक परिवर्तन याविषयक  विषय मांडणी करण्यात आली.




## २. रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन

दि.५-४-२०१९ रोजी  रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन कार्यक्रम असाणे गावातील मेनुबंरवाडी या गावात आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर माहिती अशोक जोशी यांनी दिली.यावेळी सहभागी महिलांनी विविध प्रश्न विचारले त्यांची उत्तरे हि देण्यात आली.या आजारावर कशी मात करता येईल याविषयी या कार्यक्रमात सखोल मांडणी करण्यात आली.या कार्यक्रमाला  २५ महिला उपस्थित होत्या.



## ३.रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन

दि.५-४-२०१९ रोजी  रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन कार्यक्रम असाणे गावातील जांभळेवाडी या गावात आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर माहिती अशोक जोशी यांनी दिली.यावेळी सहभागी महिलांनी विविध प्रश्न विचारले त्यांची उत्तरे हि देण्यात आली.या आजारावर कशी मात करता येईल याविषयी या कार्यक्रमात सखोल मांडणी करण्यात आली.या कार्यक्रमाला  ३५ महिला उपस्थित होत्या.

## ४.रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन

दि.५-४-२०१९ रोजी  रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन कार्यक्रम असाणे गावातील जांभळेवाडी या गावात आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर माहिती अशोक जोशी यांनी दिली.यावेळी सहभागी महिलांनी विविध प्रश्न विचारले त्यांची उत्तरे हि देण्यात आली.या आजारावर कशी मात करता येईल याविषयी या कार्यक्रमात सखोल मांडणी करण्यात आली.या कार्यक्रमाला  ३५ महिला उपस्थित होत्या.



## ५.रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन –

दि.१७-४-२०१९ रोजी रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन कार्यक्रम अगाणे या गावात आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर माहिती अमोल वाघमारे यांनी दिली.यावेळी सहभागी महिलांनी विविध प्रश्न विचारले त्यांची उत्तरे हि देण्यात आली.या आजारावर कशी मात करता येईल याविषयी या कार्यक्रमात सखोल मांडणी करण्यात आली.या कार्यक्रमाला २५ महिला व इयत्ता ५ वी ते ७ वी.च्या सुमारे १५ विद्यार्थिनीही उपस्थित होत्या.यावेळी एम.के.सी.एल चे श्रीनिवास खेर सर उपस्थित होते.




## ६.रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन –

दि.१८-४-२०१९ रोजी रक्तपांढरी आजाराविषयक मार्गदर्शन कार्यक्रम आमडे या गावात आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना या आजाराविषयक सविस्तर माहिती अमोल वाघमारे यांनी दिली.यावेळी सहभागी महिलांनी विविध प्रश्न विचारले त्यांची उत्तरे हि देण्यात आली.या आजारावर कशी मात करता येईल याविषयी या कार्यक्रमात सखोल मांडणी करण्यात आली.या कार्यक्रमाला १५ महिला उपस्थित होत्या.



## ७.रक्त तपासणी व रक्तक्षय आजार याविषयी माहिती –

साक्षरता वर्गातील महिलांची अडविरे या गावतील प्राथमिक आरोग्य केंद्रात एच.बी.तपासणी करण्यात आली.यावेळी या आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.चपटे सर यांनी उपस्थित महिलांना रक्तक्षय या आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या प्रसंगी सुमारे ४० महिलांची रक्ततपासणी करण्यात आली.दि.१५-५-२०२९ रोजी हा कार्यक्रम पार पडला.



## ८.रक्त पांढरी आजार विषयक मार्गदर्शन व औषधउपचार-

पुणे येथील डॉ.तृप्ती चोपडा यांच्या सहकार्यातून राजपूर व लोहारवाडी येथील साक्षरता वर्गात ज्या महिलांना अनिमिया आहे अशा महिलांना नियमित मार्गदर्शन व औषधउपचार केला जातो.याचाच एक भाग म्हणून दि.१७-५-२०१९ रोजी त्यांनी राजपूर व लोहारवाडी येथील साक्षरता वर्गातील महिलांना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना औषधे दिली.



## ९. साक्षरता कार्यक्रमाअंतर्गत प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम –

मागील वर्षी साक्षरता वर्गात नवसाक्षर झालेल्या महिला यांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली.या परीक्षेच्या आधारे नवसाक्षर यांनी साक्षरता कौशल्ये किती हस्तगत केलेली आहेत.याचे मूल्यमापन करण्याचे काम व त्यांना प्रमाणपत्र तयार करण्याचे काम केले.राज्य साधन केंद्र,पुणे या संस्थेच्या वतीने हि मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली होती.या साक्षरता परीक्षेत ज्या महिलांनी यश संपादन केले त्यांना गुणप्रमाणपत्र वितरण कार्यक्रम दि.२४-११-२०१९ रोजी घेण्यात आला.यावेळी सुमारे १५० पेक्षा अधिक महिलांना  गुणपत्रिका वितरण कार्यक्रम पार पडला.




## 10.साक्षरता वर्गातील महिला यांचे प्रशिक्षण –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात या वर्षी पुन्हा १० गावात साक्षरता वर्ग सुरु होत आहे.या साक्षरता वर्गाच्या माध्यमातून सुमारे २०० महिला साक्षर होणार आहेत.या महिलांना साक्षरता वर्गात लेखन,वाचन याबरोबरच कायदा,आर्थिक,आरोग्य साक्षरतेचे धडे हि दिले जाणार आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम दि.५-१-२०२० रोजी घोडेगाव ता.आंबेगाव येथे पार पडला.यावेळी डॉ.हनुमंत भवारी व अमोल वाघमारे यांनी साक्षरता वर्गातील स्वयंसेवक महिला यांना प्रशिक्षण दिले.साक्षरता विषयक आपण काही तंत्रज्ञान वापरून शिकण्याची प्रक्रिया सोपी व सुलभ केल्यास अनेक निरक्षर साक्षर होऊ शकतात.त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम ग्रामीण विकासावर होऊ शकतो.



## 11.साक्षरता वर्गातील स्वयंसेविका प्रशिक्षण-

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात ९ वाड्या-वस्त्यावर रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून साक्षरता वर्ग सुरु आहेत.या साक्षरता वर्गात शिकविण्याचे काम करणाऱ्या स्वयंसेविका यांचे प्रशिक्षण दि.६-२-२०२० रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय येथे आयोजित करण्यात आले होते.यावेळी सुमारे १२ स्वयंसेविका यांना प्रशिक्षण देण्यात आले.साक्षरता वर्गाच्या माध्यमातून महिलांची निरक्षरता तर दूर होतेच परंतु त्यांच्यामध्ये आत्मविश्वास येऊन त्यांचा ग्रामसभेच्या कामकाजात हस्तक्षेप वाढू लागतो.



## 12.साक्षरता स्वयंसेवक प्रशिक्षण –

आंबेगाव तालुक्यात रोटरी क्लबच्या सहकार्यातून ९ गावात साक्षरता वर्ग सुरु केलेले आहेत.व या साक्षरता वर्गाचे स्थानिक संयोजन आदिम संस्था करीत आहे.या साक्षरता वर्गात शिकविण्याचे काम करणाऱ्या स्वयंसेवक महिलांना साक्षरता विषयक प्रशिक्षण दि.१-३-२०२० रोजी घोडेगाव येथे आयोजित केले होते.या प्रशिक्षणात सबंधित महिला यांना साक्षरता हे कौशल्ये कसे निरक्षर यांना द्यायचे याविषयी मार्गदर्शन केले.



# रोजगार

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात रोजगाराची प्रचंड वानवा आहे.भात हेच प्रमुख पिक या भागात आहे.मोठ्या प्रमाणात रोजगारासाठी स्थलांतर हि होत आहे.एका बाजूला रोजगाराची प्रचंड वानवा असताना मात्र हा भाग नैसर्गिक संपदेणे मात्र भरभरून असा आहे.अशा पार्श्वभूमीवर स्थानिक भागातील पिके व वन संपदा यावर प्रक्रिया करून रोजगार निर्मिती होऊ शकते याच अनुषंगाने संस्था या भागात कार्यरत आहे.या भागात अगोदरच भीमाशंकर बेरोजगार सहकारी संस्था सुरु झालेली आहे.हि संस्था याच उद्देशाच्या पूर्ततेसाठी काम करीत आहे,त्यामुळे या संस्थेला सहकार्य करणे व त्यांचा हा उद्देश कसा परिपूर्ण होईल या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.या पार्श्वभूमीवर या वर्षात खालील कामे करता आली.

## १.भीमाशंकर नैसर्गिक उत्पादने विक्री केंद्र –

या भागातील आदिवासी बंधू भगिनींनी बनवलेल्या विविध वस्तू व पदार्थ भीमाशंकर रोडवर विक्री करण्यासाठी ठेवायचे होते.पण यासाठी लागणारी आर्थिक मदत कमी पडत होती.या पार्श्वभूमीवर आदरणीय विवेक सावंत सर यांना मिळालेल्या एका पुरस्काराची सुमारे ५१,००० रूपये रक्कम त्यांनी या विक्री केंद्रासाठी दिली.त्यामळे हे विक्री केंद्र सुरु होत आहे.हे विक्री केंद्र दि.२३-५-२०१९ रोजी भीमाशंकर रोडवर सुरु करण्यात आले.या विक्री केंद्राला निवृत्त पोलीस अधिकारी श्री.सुरेश खोपडे साहेब यांनी भेट देऊन या प्रकल्पाचे कौतुक केले.

.



## 2.बांबू पासून आकाशकंदील व राखी –

रोटरी क्लब यांच्या सहकार्यातून ऑगस्ट ते नोव्हेंबर ,२०१९ या महिन्याच्या काळात बांबू पासून राखी बनवणे व बांबूपासून आकाश कंदील तयार करणे हे काम फलोदे व परिसरातील आदिवासी बांधवाना देण्यात आले होते.या प्रकल्पाला रोटरी क्लब मेट्रो सहकार्य करीत आहे.तर स्थानिक पातळीवर या प्रकल्पाचे संयोजन भीमाशंकर बेरोजगार स्वयंरोजगार सहकारी संस्था करीत आहे.या या आकाशकंदील व बांबू पासून च्या राख्यांची विक्री करण्यासाठी संस्थेने योग्य ते सहकार्य केले व स्थानिक आदिवासी बांधवाना अधिकाधिक रोजगार कसा मिळेल यासाठी प्रयत्न केले गेले.



## ३.बांबू प्रदर्शन भेट-

दि.१४-१२-२०१९ रोजी मोशी येथील किसान कृषी प्रदर्शन याला भेट देण्यात आली.यावेळी बांबूच्या क्षेत्रात काम करणारे डॉ.बेडेकर यांच्या सोबत हि मिटिंग झाली.यावेळी बेडेकर यांनी आपल्या बांबू प्रकल्पाला सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्याचे मान्य केले.



## ४.शबरी वित्त पुरवठा अधिकारी यांची भेट –

आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील जे तरून होतकरू युवक काही उद्योग उभा करण्यासाठी इच्छुक आहेत त्यांना आदिवासी विकास विभागाचे शबरी  वित्त पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी भेट दिली.या भेटीच्या आयोजनात पुढाकार घेतला होता व भेटीला आल्यानंतर त्यांच्या सोबत थांबून सबंधित युवक यांच्या घरी भेटी देण्यात आल्या.या युवकांना शेळीपालन व पर्यटन या प्रकल्पासाठी कर्ज हवे आहे.खऱ्या गरजूंना हे कर्ज उपलब्ध व्हावे यासाठी आपण प्रयत्न करत आहोत.यातील एकजण याने महालाभार्थी या वेबपोर्टल वर नोंदणी केलेली आहे.आपला एक कार्यकर्ता पर्यटन व्यवसाय करू इच्छित आहे.त्याला आपण सहकार्य करीत आहे.हा प्रकल्प उभा राहिल्यास स्थानिक किमान १० लोकांना तरी रोजगार प्राप्ती होईल.



# अन्नसुरक्षा प्रकल्प

## प्रास्ताविक-

मागील वर्षापासून राष्ट्रीय जनवकालत संस्था,पुणे यांच्या सहकार्यातून अन्नसुरक्षा प्रकल्प सुरु आहे.या प्रकल्पाअंतर्गत रेशन व्यवस्था,शालेय मध्यान्ह भोजन व्यवस्था व अंगणवाडीतील पोषक आहार यावर जनता कशी देखरेख करेल या अनुषंगाने प्रयत्न सुरु आहेत.या प्रकल्पाचा भाग म्हणून यावर्षात झालेले निवडक कार्यक्रम यांची माहिती याठिकाणी दिलेली आहे.या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार झालेला असल्याने येथे सर्वच कार्यक्रमांची नोंद घेण्यात आलेली नाही.

1. **पिंपरी गावात पाककला स्पर्धा –**

   अंगणवाडी येथे मिळणारा पौष्टिक आहार हा अनेक वेळा चवीला चांगला लागत नसल्याने तो जनावरांना दिला जातो.या पार्श्वभूमीवर या आहारा पासून विविध पदार्थ बनवून हे हा आहार खाल्ला कसा जाईल यासाठी या आहारापासून विविध पदार्थ बनविण्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.या स्पर्धेत विजेत्या महिलांना आकर्षक पर्स देण्यात आली.या स्पर्धेचे परीक्षण आरोग्यसेविका वर्षा मावळे यांनी केले तर प्रमुख पाहुण्या म्हणून गावच्या सरपंच सौ.संगीता वडेकर उपस्थित होत्या.हि स्पर्धा १-५-२०१९ रोजी सायंकाळी पिंपरी या गावात पार पडली.या स्पर्धेचे संयोजन कृष्णा वडेकर यांनी केले होते.

2. **ग्राम,आरोग्य,पोषण आहार समिती प्रशिक्षण –**

   गावाच्या विकासात अत्यंत महत्वपूर्ण असणारी समिती म्हणजे ग्राम,आरोग्य,पोषण आहार समिती हि होय.परंतु गावपातळीवर हि समिती तशी दुर्लक्षित असते.या समितीचे अध्यक्ष मा.सरपंच असतात.या समितीतील सदस्य यांचे एकदिवसीय प्रशिक्षण मे,२०१९ या महिन्याच्या अखेरीस शहीद राजगुरू ग्रंथालय येथे आयोजित केले होते.या सदस्यांना तालुका आरोग्य अधिकारी डॉ.ढेकळे सर यांनी उद्बोधित केले.हे प्रशिक्षण पाच गावातील समिती सदस्य यांचेसाठी आयोजित केले होते.यात बोरघर,न्हावेड,पिंपरी,फलोदे व गोहे खु.या गावांचा समावेश होता.यावेळी राष्ट्रीय जनवकालत संस्था,पुणे या संस्थचे प्रतीनिध जी उपस्थित होते.

### ३.सोशल OUDIT कार्यशाळा –

दि.११-१-२०२० रोजी शहीद राजगुरू ग्रंथालय,फलोदे येथे सोशल OUDIT कार्यशाळा पार पडली.या कार्यशाळेत परिसरातील सुमारे ५० पेक्षा अधिक नागरिक उपस्थित होते.गाव पातळीवर विविध सरकारी योजनांच्या देखरेख व तपासणी कामी हि सोशल OUDIT कार्यशाळा अत्यंत महत्वपूर्ण ठरली.या कार्यशाळेत उपस्थिताना मार्गदर्शन श्री.भाऊसाहेब आहेर यांनी केले.या कार्यशाळेतून गावपातळीवर नागरिकांच्या माध्यमातून एक सोशल OUDIT करणारा गट तयार करून गावाच्या कारभारात पारदर्शकपणा कसा येईल यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.



# आरोग्य विषयक कार्यक्रम

## 1.आरोग्य शिबीर –

दि.२२-१२-२०१९ रोजी कुरवंडी ता.आंबेगाव येथे आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.हे आरोग्य शिबीर जन आरोग्य मंच यांच्या सहकार्यातून आयोजित करण्यात आले होते.यावेळी सुमारे १०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.डोळे,महिलांचे आजार व दातांचे आजार याविषयी मोफत तपासणी व औषधउपचार करण्यात आले.आरोग्य शिबिराच्या माध्यमातून ग्रामस्थ व आपण याचे सबंध येऊ लागले आहेत.सिलेज प्रकल्पा करिता या आरोग्य शिबिराचा नक्कीच फायदा होईल.




## २.एच.आय.व्ही.या आजाराबाबत जाणीवजागृती कार्यक्रम -

एच.आय.व्ही. या आजाराविषयी समाजात असलेले गैरसमज दूर व्हावे,या आजाराची सर्वसाधारण माहिती लोकांपर्यंत जावी, या आजाराला प्रतिबंध कसा घालता येईल याविषयी लोकांमध्ये माहिती देणे व या आजाराच्या रुग्णाला समाजात चांगली वागणूक मिळावी हा संदेश समाजापर्यंत घेऊन जाण्याच्या हेतूने पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील सुमारे ४३ वाड्या-वस्त्यांवर हा संदेश पथनाट्याच्या माध्यमातून देणे हि प्रमुख भूमिका या कार्यक्रमामागे होती.

सुमारे १५ मिनिटाचे एक पथनाट्य आदिम संस्थेचे कार्यकर्ते या ठिकाणी जावून सादर करीत होते.या पथनाट्याचा आशय खालीलप्रमाणे होता-

- एच.आय.व्ही कशामुळे होतो व कशामुळे होत नाही हि माहिती लोकांपर्यंत पोहचविणे.
- एच.आय.व्ही होऊ नये म्हणून काय काळजी घ्यावी.
- हा आजारातून आपले आयुर्मान वाढविणेसाठी काय केले पाहिजे.
- या आजार असलेल्या रुग्णाशी समाजाशी वागणूक कशी असावी.

या प्रमुख मुद्यांच्या आधारे या पथनाट्यात एक संहिता तयार करून ते सादर केले गेले. लोकांमध्ये आजाराविषयी चे असलेले गैरसमज दूर करणे,त्यांना योग्य ती शास्त्रीय माहिती पोहच करणे, समाजाचा या रुग्णांप्रती असलेला तुसडेपणाचा,अलगतावादी दृष्टीकोन बदलून तो सर्वसमावेशक व सकारात्मक व्हावा या प्रमुख हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते .

एच.आय.व्ही आजार हा पूर्णपणे उपचार घेतले,नियमित व्यायाम व पोष्टिक आहार घेतला तर सबंधित व्यक्ती नैसर्गिक जीवन जगू शकते,हा हि संदेश लोकांमध्ये देऊन लोकांच्या मनातील भीती दूर करणे हि एक प्रमुख भूमिका या कार्यक्रमामागे होती.

ग्रामीण व विशेषत आदिवासी भागात आजही अशा प्रकारच्या आजारावर खुलेपणाने चर्चा केली जात नाही,या पार्श्वभूमीवर या पथनाट्याचे विशेष महत्व होते,लोकांना आजाराविषयी नुसतीच तोंडी माहिती सांगण्याचे नियोजन केले असते तर लोकांची उपस्थिती अत्यंत तोकडी झाली असती.व लोकांना एकत्रित करणे हे कठीण काम झाले असते.त्यामुळेच या आजाराविषयी माहिती पथनाट्याच्या माध्यमातून सांगण्याचे नियोजन केले होते.

**या कार्यक्रमातील ठळक मुद्दे**

- पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील वाडी-वस्तीवर एकूण ४२ ठिकाणी व भोसरी,पुणे येथे १असे एकूण ४३ ठिकाणी एच.आय.व्ही विषयक जाणीव-जागृती चे कार्यक्रम पथनाट्याच्या माध्यमातून सादर करण्यात आले.
- यातील भोसरी येथील एक कार्यक्रम व घोडेगाव येथील विद्यार्थी अभ्यास शिबीर येथील १ कार्यक्रम असे दोन कार्यक्रम जानेवारी २०२० महिन्यात पार पडले. व शिल्लक कार्यक्रम फेब्रुवारी महिन्यात दि.२० ते २८ या दरम्यान पार पडले.
- या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे २७२० लोकांपर्यंत पोहचून त्यांना एच.आय.व्ही.या आजाराविषयी माहिती पथनाट्याच्या माध्यमातून देण्यात आली.
- पथनाट्याची टीम एकूण पाच ते सात लोकांची होती.
- संस्थेची रुग्णवाहिका असल्याने हे कार्यक्रम घेणे शक्य झाले.
- अनेक कार्यक्रमात लोकप्रतिनिधी उपस्थित होते.
- वर्तमानपत्रात हि कार्यक्रमाविषयी बातमी प्रसिद्ध झाले.
- या कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये असलेले एच.आय.व्ही.आजाराविषयी चे गैरसमज दूर होण्यास मदत झाली.



## ३.कोरोना जाणीवजागृती प्रकल्प –

संपूर्ण जगभर कोरोना हा विषाणू आणि त्यातून बळावनारा आजार व त्यातून होणारे मृत्यू यामुळे हादरून गेलेले आहे.आपल्या राज्यात सुरुवातीच्या काळात कोरोनाच्या साथीमुळे जनमानसाच्या मनात भीती व अनेक गैरसमज पसरले होते . या भीतीमुळे ग्रामीण भागात माणसामाणसांमध्ये चुकीच्या अफवा, खोटी माहिती पसरवली जात होती. लोकांमध्ये कोरोना विषाणूची लक्षणे काय असतात व त्यावर काय उपाय योजला जातो. तसेच या आजारापासून बचावासाठी आपण काय काळजी घेऊ शकतो, याची शास्त्रशुद्ध माहिती लोकांपर्यंत पोहचावी यासाठी जनजागृतीची आवश्यकता वाटत होती. या पार्श्वभूमीवर आपण या विषाणूपासून स्वतः चा व इतरांचा बचाव करण्यासाठी व लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष जनजागृती अभियान घेण्याचा आमची संस्था विचार करत होती.

याच दरम्यान ललित कलामंदिर विश्वस्त सार्वजनिक निधी,पुणे या संस्थेचे विश्वस्त श्री.बाळू वायाळ सर यांच्याशी चर्चा झाली.त्यांना या संस्थेतील इतर विश्वस्त लोकांशी चर्चा करून अशा प्रकारचा जाणीवजागृती कार्यक्रम आयोजित करण्यास त्वरित मान्यता दिली.

कोरोना विषयी ग्रामीण भागात योग्य ती माहिती जावी यासाठी हा जाणीवजागृती कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.शहीद राजगुरू ग्रंथालय यांची रुग्णवाहिका भाडे तत्वावर घेऊन हा जाणीवजागृती कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.एकूण तीन दिवसात ५० पेक्षा अधिक वाड्या-वस्त्यांवर जावून कोरोना या आजाराविषयी माहिती देण्याचे नियोजन केले होते. परंतु सरकारी आदेश यामुळे दोन दिवस हा कार्यक्रम करावा लागला.या दोन दिवसात दुमारे ३८ वाड्या-वस्त्यांवर जावून करोना आजाराविषयी माहिती नागरिकांना पत्रकाच्या माध्यमातून देण्यात आली.यासाठी सुमारे ३००० पत्रक छापण्यात आली होती.व हि ३००० पत्रके सुमारे ३००० लोकांपर्यंत पोहचवून लोकांच्या मनातील शंका दूर करण्यात आल्या.हा कार्यक्रम दि. २०-२१ मार्च,२०२०या दरम्यान पार पडला.

तालुका स्तरावर हा कार्यक्रम घेनेसाठी घोडेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्री.प्रदीप पवार सर,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.ढेकळे सर यांनी मोलाचे सहकार्य केले.



# कार्यशाळा/परिषदा/व्याख्याने

## १..जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विशेष व्याख्यान –

दि.९ ऑगस्ट हा जगभरात जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो.या दिवसाचे औचित्य साधत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात समाजशास्त्र विभाग व आदिम संस्था,फलोदे ता.आंबेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यान कार्यक्रम आयोजित केला होता.यावेळी डॉ.भौमिक देशमुख सर व डॉ.आलेम यांनी आजचे आदिवासीचे प्रश्न याविषयी सविस्तर मांडणी केली.या कार्यक्रमामुळे विद्यार्थांना आदिवासी समुदायाचे प्रश्न याविषयी माहिती मिळण्यास नक्कीच फायदा झाला.याबरोबर यावेळी एम.के.सी.एल.यांनी केलेले वनहक्क विषयीचे software यासंबधी हि माहिती देण्यात आली.



## २.घोडेगाव महाविद्यालयात विशेष कार्यक्रम –

दि.१४-१२-२०१९ रोजी घोडेगाव येथील बी.डी.काळे महाविद्यालय येथे संविधान आणि आपले भवितव्य या विषयाच्या अनुषंगाने व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.सामाजिक कार्यकर्ते अजित अभ्यंकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधान व तिचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली.महाविद्यालयीन स्तरावर हा कार्यक्रम झाल्यानंतर अनेक विद्यार्थी स्वतंत्रपणे वक्त्यांशी व आयोजकांशी भेट घेऊन त्यांनी आपल्या मनातील प्रश्न विचारले हे प्रश्न मुख्यत अलीकडील काळात राजकीय परिस्थिती मध्ये ज्याप्रमाणे बदल झाले आहेत.व ३७० चे कलम या पार्श्वभूमीवरचे होते.संविधान विषय घेऊन महाविद्यालयीन स्तरावर विशेष व्याख्याने होणे हि गरज वाटली.





### ३आदिवासी-दलित विषयक बजेट वर कार्यशाला –

दि.२१-१२-२०१९ रोजी घोडेगाव ता.आंबेगाव येथे आदिवासी-दलित बजेट यावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेत मार्गदर्शन ad.प्रियदर्शी तेलंग,प्राची साळवे,ad.नाथा शिंगाडे यांनी केले.या कार्यशाळेत एमकेसीएल चे विनायक कदम व योगेश बिचकुले सहभागी झाले होते.बजेट विषयी सोप्या शब्दात माहिती सामान्य माणसांपर्यंत कशी पोचवायची हा आपल्या समोरील प्रश्न आहे.हा विषय नीटपणे लोकांत गेला तर अनेक चुकीच्या गोष्टीना आळा बसेल.



### ४.आदिवासी वनहक्क कायद्याच्या अनुषंगाने व्याख्यान –

दि. ६-१-२०२० रोजी असाने ता.आंबेगाव येथे पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालय,पोखरी यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर आले होते.या शिबिरात व्याख्यान दिले.या व्याख्यानाचा विषय आदिवासी समाजासमोरील आव्हाने हा होता.या विषयाच्या अनुषंगाने आदिवासी वनहक्क कायद्याची अमलबजावणी या विषयावर सविस्तर मांडणी करण्यात आली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजू घोडे व असाने गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# अभ्यास सहल

१.दि.२८-4-२०१९ रोजी सहयाद्री स्कूल येथे भेट देण्यात आली.यावेळी या शाळेने जे विविध देशी बी-बियाणे जतन केलेले आहे त्याची पाहणी केली व येथून काही भाताचे देशी वाणाचे बियाणे हि खरेदी करण्यात आले.

## २.मोहा,ता.अंबेजोगाई येथे भेट –

दि.२९ व ३० सप्टेंबर,२०१९ रोजी जलतज्ञ डॉ.राजेंद्रसिंह यांच्या सोबत प्रवास करण्याची संधी मिळाली.यावेळी झालेल्या चर्चेतून जलसंधारण,मृत नद्या याविषयी सविस्तर बोलता आले.एम.के.सी.एल.ने मोहा ता.आंबेजोगाई येथे ग्रामविकासाचे काम सुरु केले होते,हे काम आज खूप जोमाने वाढत आहे.या गावाला भेट देऊन या गावाने जलसंधारण विषयी केलेल्या कामाची पाहणी केली.यातून नक्कीच खूप शिकायला मिळाले.विशेषत आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात जलसंधारण काम सुरु करण्याअगोदर  मृत नद्या जिवंतकशा करता येतील याविषयी काही नियोजन करता येईल.



## ३.आयआयटी पवई येथे भेट-

आयआयटी पवई,मुंबई येथे दि.३० जानेवारी २०२० रोजी हिरडा या वनउपज विषयक एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेत हिरडा या वनउपजाला अधिकचा दर स्थानिक आदिवासी शेतकरी यांना कसा मिळेल याविषयी चर्चा करण्यात आली.याबरोबरच हिरडा पासून विविध प्रकारची औषधे करून त्यातून काही रोजगार निर्मिती होऊ शकेल का याविषयी हि शक्यता व्यक्त करण्यात आली.या कार्यशाळेत विविध शासकीय विभागाचे प्रशासकीय अधिकारी व स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.या कार्यशाळेत उपस्थित राहून स्थानिक स्तरावरील परिस्थिती विषद केली.

# मदत वाटप

## २.गरीब कुटुंबाना आरोग्य विषयक साहित्य व थंडीचे कपडे वाटप –

दि.५-१-२०२० रोजी डिंभे ता.आंबेगाव येथील कातकरी वस्ती यांना थंडीचे कपडे वाटप करण्यात आले.व जीवन आवश्यक काही साहित्य देण्यात आले.हे साहित्य पुणे येथील एका सेवाभावी संस्थेच्या सहकार्यातून देण्यात आले.यामुळे येथील कातकरी वस्तीचे भीषण वास्तव जाणवले.या वस्तीची जमीन हि जलसंपदा विभागाची आहे.त्यावर यांच्या झोपड्या आहेत.या झोपड्यांना कायदेशीर मान्यता नसल्याने घरकुल योजना मंजूर होऊन हि येथे घरे बांधता येत नाहीत.त्यामुळे कच्च्या घरांच्या शिवाय पर्याय नाही.



# महत्वपूर्ण बैठका

**१.आदिवासी संशोधन,प्रशिक्षण संस्थेच्या सहसंचालक यांच्या सोबत बैठक –**

दि.१५-११-२०१९ रोजी पुणे येथील आदिवासी संशोधन,प्रशिक्षण संस्थेच्या सहसंचालक,श्रीमती नंदिनी आवाड madam यांच्या सोबत बैठक पार पडली.यावेळी वनहक्क कायद्याची अमलबजावणी याविषयाच्या अनुषंगाने चर्चा झाली.वनहक्क कायद्याची गावस्तरावर कशी अमलबजावणी होईल यासाठी प्रयत्न संयुक्तीक पणे करण्याचे ठरले.याबरोबरच पुणे येथील एका विशेष कार्यक्रमात आपल्या उत्पादनांचा stall लावण्यास त्यांनी त्यांच्यावतीने परवानगी दिलेली आहे.आदिम संस्थेच्या कामांची माहिती देऊन भविष्यात काही एकत्रित कार्यक्रम करता येतील का याविषयी हि चर्चा झाली.

२. १.दि.२७-१२-२०१९ रोजी घोडेगाव येथील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.इंद्रजीत जाधव सर यांच्यासोबत बैठक पार पडली.यावेळी महाविद्यालय आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागात स्थानिक संस्थांच्या सहकार्यातून काय काय करू शकतात याविषयी चर्चा झाली.

## साध्य बाबी

- मागील वर्षी सुरु झालेला साक्षरता प्रकल्प यावर्षी संपला.या साक्षरता प्रकल्पात सुमारे ३५० पेक्षा अधिक महिला साक्षर झाल्या.याबरोबरच या महिलांची रक्तक्षय या आजारापासून हि मुक्तता कशी होईल यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.
- संस्थेने पुढाकार घेऊन यावर्षात दोन कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडल्या.या दोन्ही कार्यशाळा आदिवासी,दलित यांच्या मुलभूत प्रश्नांविषयी होत्या.समाजात काही मुलभूत परंतु दुर्लक्षित अशा विषयावर या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या.
- एच.आय.व्ही.आजार याविषयी समाजात जाणीवजागृती करण्यासाठी सुमारे ४३ वाड्या-वस्त्यांवर हा जाणीवजागृती कार्यक्रम आपण यशस्वीपणे राबविला.यामाध्यमातून संपूर्ण आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात या विषयाचे स्वरूप आपल्याला पोहचविता आले.
- कोरोना या आजार विषयक आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात अगदी सुरुवातीलाच आपण जाणीवजागृती केल्याने त्यामुळे नागरिकांना त्याचा खूप फायदा झाला व प्रशासनाने हि त्याचे कौतुक केले.